अटल सेतू मॅरेथॉनसाठी 13 तास बंद

मुंबई : अटलबिहारी वाजपेयी शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतू शनिवारी रात्री ११ वाजल्यापासून रविवारी दुपारी १ वाजेपर्यंत वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) रविवारी, १६ फेब्रुवारीला मॅरेथॉन शर्यतीचे आयोजन करण्यात आले आहे. या मॅरेथॉन शर्यतीसाठी अटल सेतू सलग १३ तास बंद राहणार आहे. त्यामुळे नवी मुंबई, पुण्याकडे जाण्यासाठी वाहनचालक-प्रवाशांना पर्यायी मार्गाचा वापर करावा लागणार आहे.अटल सेतू जानेवारी २०२४ मध्ये वाहतूक सेवेत दाखल झाला आहे. या सेतुमुळे मुंबई ते नवी मुंबई अंतर केवळ १२ मिनिटांत पार करता येत आहे. मात्र यासाठी वाहनचालक-प्रवाशांना पथकर मोजावा लागतो. असे असले तरी अतिजलद प्रवास करण्यासाठी वाहनचालक-प्रवासी अटल सेतूचा पर्याय निवडतात. असा हा अटल सेतू शनिवारी रात्री ११ वाजता वाहतुकीसाठी बंद केला जाणार आहे. शनिवारी रात्री ११ ते रविवारी दुपारी १ वाजेपर्यंत अटल सेतूवरील वाहतूक पूर्णत: बंद राहणार आहे.

दैनंदिन वापरात इंधन बचत केल्यास शाश्वत विकास शक्य !

मंत्री आदिती तटकरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई- सौर ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर करणे, तसेच दैनंदिन वापरात इंधनाची बचत केल्यास भविष्यासाठी ऊर्जा सुरक्षा, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाचे उद्दिष्ट गाठता येईल, असा विश्वास महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय आणि राज्य शासनाच्या सहकार्याने हरित उर्जेचा वापर करून पर्यावरणाचे संरक्षण करण्यासाठी जनजागृतीवर उपक्रम राबविण्यात येतात. या अंतर्गत सक्षम २०२४-२५ (संरक्षण क्षमता महोत्सव) १४ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवाचे उद्घाटन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मंत्री कु.तटकरे बोलत होत्या.

कार्यक्रमास भारत पेट्रोलियम कार्पोरेशनचे विझनेस हेड राहुल टंडन, हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशनचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक देवाशिश बसक, बीपीसीएलचे राज्य प्रमुख राकेश सिन्हा,इंडियन ऑईलचे व्यवस्थापकीय संचालक अभिजीत पिते, जीएआयएल इंडिया लि.चे उपसंचालक मोहम्मद शफी अवान, वरिष्ठ व्यवस्थापक दिपक वाघ, रितेश जाधव यांच्यासह अधिकारी आणि विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते. यावेळी रंगमंच समुहाच्या पथनाट्याद्वारे मुलांना इंधनबचतीचा संदेश देण्यात आला. तसेच इंधन बचतीसाठी यावेळी सामूहिक प्रतिज्ञाही घेण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या महोत्सवास शुभेच्छा दिल्या.

तेल विपणन कंपन्या करणार 'इंधन संवर्धन' जागृती

१४ ते २८ फेब्रुवारीपर्यंत तेल विपणन कंपन्या राज्यभरात संवर्धनाबद्दल जागरूकतता निर्माण करण्यासाठी आणि शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणासाठी मोहीम राबविणार आहे. यामध्ये विद्यार्थी, तरुण, वाहन चालक, क्लिनर, कर्मचारी, शेतकरी, निवासी संस्था, ग्रामपंचायती, स्वयंसेवी संस्था अशा अनेकांपर्यंत पोहोचून इंधन बचतीचे महत्व, फायदे यासंदर्भात जागृती करण्यात येणार आहे. इंधन कार्यक्षम तंत्रज्ञान आणि पद्धतीचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देण्यासाठी विविध इंधन संवर्धन उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सायक्लोथॉन, वॉकथॉन, चित्रकला स्पर्धा, इंधन कार्यक्षम ड्रायव्हिंग स्पर्धा असे विविध उपक्रमांच्या माध्यमातून इंधन बचतीचा संदेश पोहोचविला जाणार आहे.

78 कोटींची थकबाकी ; 'डीबीएस रिऍलिटी'च्या चांदिवलीतील 18 मालमत्तांवर पालिकेची टाच

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई - मुंबई महापालिकेचा तब्बल १७८ कोटी ६४ लाख रुपये इतका मालमत्ता कर थकविल्याने महापालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्याने 'डीबीएस रिऍलिटी कंपनी' च्या चांदिवली येथील एकूण १८ मालमत्तांवर टाच आणली आहे. 'डीबीएस रिऍलिटी' कंपनी'ने २१ दिवसात करभरणा न केल्यास त्यांची मालमत्ता जप्त करून लिलावाची कार्यवाही केली जाईल, असा गंभीर इशारा महापालिकेने दिला आहे.

महापालिकेच्या करनिर्धारण व संकलन खात्याने सातत्याने आवाहन करुन आणि पाठपुरावा केल्यानंतरही मालमत्ता कर भरणा करण्यास टाळाटाळ करणाऱ्या मालमत्ताधारकाच्या विरोधात जप्ती व अटकावणी आणि लिलाव करण्याची कठोर कारवाई करण्यात येत आहे. या मालमत्तांमध्ये भूखंड आणि निवासी - व्यावसायिक इमारती, व्यावसायिक



गाळे, औद्योगिक गाळे आदींचा समावेश आहे. त्यामुळे महापालिकेची मालमत्ता करापोटी कोट्यवधी रुपयांची थकबाकी प्रलंबित ठेवणाऱ्या बड्या मालमत्ता थकबाकीदारांचे धाबे दणाणले आहेत.

महापालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ.अश्विनी जोशी यांच्या निर्देशांनुसार आणि सहआयुक्त (कर निर्धारण व संकलन) विश्वास शंकरवार यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई महापालिका कार्यसेवातील मालमत्ताधारकांकडून करसंकलन करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सर्व संबंधितांनी दिलेल्या मुदतीत करभरणा करावा आणि दंडात्मक तसेच कायदेशीर कारवाई टाळावी, असे आवाहन महापालिका प्रशासनाकडून वेळोवेळी केले जात आहे. तथापि, कर भरणा करण्यास टाळाटाळ करणा-यांवर कठोर कारवाई करण्यास प्रशासनाने सुरुवात केली आहे.

अद्याप १,३७७ कोटी वसुली बाकी

महापालिकेच्या कर निर्धारण व संकलन विभागाने सन २०२४ - २५ या आर्थिक वर्षात ६ हजार २०० कोटी रूपये कर संकलन उद्दिष्ट निश्चित केले आहे. तथा दृष्टीने विविध पातळ्यांवर कार्यवाही सुरू आहे. २६ मे २०२४ ते १२ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत ४ हजार ८२३ कोटी रूपयांचे कर संकलन झाले आहे. म्हणजेच ३१ मार्च २०२५ पर्यंत उर्वरित १ हजार ३७७ कोटी रूपयांचे कर संकलन करावे लागणार आहे. मात्र कर भरणा करण्यास टाळाटाळ करणा-या तसेच आर्थिक क्षमता असूनही मालमत्ताकर न भरणा-या मोठ्या थकबाकीदारांना मुंबई महापालिकेकडून कलम २०३ अन्वये जप्तीची नोटीस बजावण्यात येत आहेत

पगार कधी मिळणार याचे सूचना पत्र आले आणि बेस्ट कामगारांचा जीव भांड्यात पडला

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगरपालिकेचा उपक्रम असलेल्या बेस्ट मधील कामगारांना दर महिन्याला १५ तारखेपर्यंत वेतन मिळते,पण त्याच दिवशी जर शनिवार, रविवार किंवा सार्वजनिक सुट्टीचा दिवस असल्यास १- २ दिवस आधी वेतन मिळते. ही वेतन मिळण्यापूर्वी ४-- ५ दिवस आधी सूचना पत्राद्वारे वेतन किती तारखेला मिळणार याची माहिती दिली जाते.पण या महिन्यात १४ तारखे पर्यंत सूचना पत्र न आल्यामुळे २७ हजार बेस्ट कामगार हवालदिल झाले होते. पण काल सकाळी सूचना पत्र आल्यानंतर कामगाराचा जीव भांड्यात पडला. आज बेस्ट कामगारांना वेतन मिळणार आहे.

बेस्ट उपक्रमात बेस्टच्या कामगार वर्गास पगार देण्यासाठी बेस्ट प्रशासनाकडे पैसे नाहीत. त्यामुळेच

वेतन सूचनेचे पत्र आले नसल्याची कामगारांची भावना झाली होती. व त्यामुळे त्यांची घालमेल सुरू झाली होती.

प्रत्येक महिन्याच्या 15 तारखेला बेस्टच्या सर्व कामगार वर्गाचा पगार होत असतो. त्यातून बेस्टच्या अनेक कामगार वर्गाचे वेगवेगळे हप्ते कापून जात असतात. पण सूचना पत्र न आल्यामुळे सर्व कामगार चिंतेत होते.बेस्ट मध्ये कामगार वर्गाने आपल्या अधिकारी वर्गास विचारले असता त्यांच्याकडे कोणतेच उत्तर नव्हते. पण काल सूचना पत्र आल्यानंतर कामगार खुश झाले आहेत.

बेस्ट कामगार सेनेचे अध्यक्ष सुहास सामंत यांनी सूचना पत्र न आल्यामुळे तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली होती. सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी बेस्ट वाचविण्यासाठी पुढे आले पाहिजे. असेही ते म्हणाले.

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड

सीआयएन: एल२७१००एमएच१९८५पीएलसी०३५२६८
२८/३०, अन्ना वाडी, चिनाणी भवन, तळ मजला, भुलेश्वर, मुंबई ४००००२ **ई-मेल :** spvglobaltrading@gmail.com संकेतस्थळ: www. spvglobal.in

३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या त्रैमासिकासाठी अलेखापरीक्षित वित्तिय निष्कर्षाचा आराखडा

(₹. लाखात/रुपये)

तपशील	एकमेव					एकत्रित				
	संपलेले तेरमाहिन	संपलेले तेरमाहिन गत वर्ष	संपलेले ९ महिने	संपलेल्या गत वर्षाचे ९ महिने	संपलेले गत वर्ष	संपलेले तेरमाहिन	संपलेले तेरमाहिन गत वर्ष	संपलेले ९ महिने	संपलेल्या गत वर्षाचे ९ महिने	संपलेले गत वर्ष
	३१ डिसे २४	३१ डिसे २३	३१ डिसे २४	३१ डिसे २३	३१ मार्च २४	३१ डिसे २४	३१ डिसे २३	३१ डिसे २४	३१ डिसे २३	३१ मार्च २४
कार्यान्वित एकूण उत्पन्न (निव्वळ)	७२.२८	२,४७८.८९	२,३९३.२७	३,१९९.९८	२,३३९.८४	२३,२३५.८४	१५,१९२.७१	४०,०७३.५२	४०,९०४.७५	६८,३१८.७१
सामान्य कार्यान्वित व्यवसायापोटी निव्वळ नफा (तोटा) (कर अपवादात्मक आणि भिन्न ऑर्डिनरि बाबी पूर्व)	(११.५७)	३६.०६	२.०४	७०.१९	६४.३७	९,१६१.६५	(२१९.८१)	२,७७६.८८	२००.६२	५,२१५.३४
कर पूर्व कार्यान्वित्तीपासून निव्वळ नफा (तोटा) (अपवादात्मक आणि भिन्न ऑर्डिनरि बाबी वजात)	(११.५७)	३६.०६	२.०४	७०.१९	६४.३७	९,१६१.६५	(२१८.८१)	२,७७६.८८	२००.६२	५,२१५.३४
कर वजात कालावधीसाठी निव्वळ नफा (तोटा) (अपवादात्मक आणि भिन्न ऑर्डिनरि बाबी वजात)	(८.९६)	२६.१४	१.५२	३५.३०	४८.०५	५५८.०९	(१७.४४)	१,४०१.०६	२५३.३९	९६०.०६
कालावधीसाठी एकूण सर्वंकष उत्पन्न (एकत्रित नफा तोटा)	(८.३८)	२८.०४	१.४२	३५.३८	४२.४२	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००
सम भाग भांडवल (दर्शनी मूल्य रु. १०/- प्रति समभाग)	११६.००	११६.००	११६.००	११६.००	११६.००	-	–	-	-	११६.००,२६
एका समभाग लेखा परीक्षित राखीवसाठ्याशिवाय ताळेबंदपत्रकात दाखविलेल्या राखीव समभाग (पुनर्मांडणी वजात)										
प्रति समभाग उत्पन्न (अनियमित बाबी नंतर) (प्रत्येकी रु. १०/-) (रु.) (वार्षिक नाही)	(०.३४)*	९.३४*	०.०८*	९.८०*	२४५	४५.२२*	(२.९५)*	३९.२८*	१२.८४*	२५.३९

टिप : "वार्षिकीकरण केलेले नाही

१. उपरोक्त निष्कर्ष सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिसक्लोझर रिक्वायरमेंटस) २०१५ च्या अनुसार प्रसिद्ध करण्यात येत आहेत आणि लेखा परीक्षण समितीने समिक्षित केले आहेत आणि संचालक मंडळाने त्याच्या फेब्रुवारी १३, २०२५ रोजी झालेल्या सभेमध्ये संमत केले आहेत. सचिवानिक लेखा परीक्षकांनी वरील निष्कर्षांचे मर्यादित परीक्षण केले आहे. ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या नऊ महिन्यासाठी आर्थिक निष्कर्षांचा पूर्ण आराखडा www.bseindia.com आणि www.spvglobal.in वर उपलब्ध आहे.
२. कंपनी (भारतीय लेखा मानक) नियमावली २०१५ (लेखेजोखे फेरफार करण्यात आल्या नुसार) अनुसार भारतीय लेखा मानक (इंड एएस) अनुसार तयार करण्यात आले आहेत आणि सभेची कायदा २०१३ च्या कलम १३३ अंतर्गत अधिसूचित करण्यात आले आहेत.
३. गत कालावधीचे आकडे चालू कालावधीच्या आकड्यांशी सुसंगत करण्यासाठी आवश्यकते नुसार पुनर्गठीत करण्यात आले आहेत

ठिकाण: मुंबई
दिनांक: १३ फेब्रुवारी, २०२५

एसपीव्ही ग्लोबल ट्रेडिंग लिमिटेड करीता
सही/-
बाळासुभ्रण किनाणी
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन: ००१७५०८०

मध्य रेल्वेच्या नवीन उपक्रमांना भारतीय रेल्वेचे प्रथम आणि द्वितीय पुरस्कार घोषित

प्रतिनिधी
■ मुंबई

सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी "भारतीय रेल्वेवरील सर्वोत्तम नवीन उपक्रमासाठी सूचना योजना" यात मध्य रेल्वेने प्रथम आणि द्वितीय पुरस्कार जिंकला आहे. पावसाळ्यात मुंबईत उपनगरीय सेवा चालवण्याचा एक महत्त्वाचा उपक्रम "पावसाळ्यात पाण्यात डुबलेल्या परिस्थितीत पॉइंट मशीन फ्लेयुअर्स रोखण्यासाठी नाविन्यपूर्ण उपाय" प्रदान केल्याबद्दल मध्य रल्वेने सर्वोत्कृष्ट नवोपक्रमाचे पहिले पारितोषिक जिंकले. विशेषत: पावसाळ्यात बुडालेल्या स्थितीत पॉइंट मशीनचे बिघाड टाळण्यासाठी उपाय शोधण्यासाठी मध्य रेल्वेच्या टीमने केलेल्या अतुलनीय प्रयत्नांकरीता हा प्रतिष्ठित पुरस्कार दिला जाणार आहे.

पॉइंट मशीन कव्हरमधील बदल मध्य रेल्वेच्या समर्पित टीमने स्वत: विकसित केला आहे, जो नाविन्यपूर्ण, किफायतशीर आणि व्यावहारिक उपायांबद्दलची वचनबद्धता दर्शवितो. मध्य रेल्वे नेटवर्कमधील विविध पूर-प्रवण ठिकाणी, विशेषत: मुंबई उपनगरीय भागात, हे उपाय लागू करण्यात आले, ज्यामुळे व्यापक सुरक्षा आणि वाढीव विश्वासार्हता सुनिश्चित झाली आहे. पावसाळ्यात पुरामुळे पॉइंट मशीनमधील बिघाड कमी झाल्यामुळे परिचालन कार्यक्षमतेत सुधार झाला. या वाढीमुळे रेल्वेचे कामकाज सुरळीत आणि अखंडित राहण्याची खात्री झाली, ज्यामुळे पॉइंट्स आणि कागदी परवाना (पेपर ऑथोरिटी) मॅन्युअल क्लॅम्पिंगची

आवश्यकता नाहीशी झाली, जी पारंपारिकपणे अशा बिघाडांच्या वेळी आवश्यक होती, ज्यामुळे वेळ लागत होता उपनगरी गाड्यांच्या वेळेवर परीणाम होत होता. पॉइंट मशीन कव्हरमधील बदल अधिक विश्वासार्ह आणि मजबूत रेल्वे पायाभूत सुविधा आणि परिचालन सुनिश्चित करतात.

डब्यांचे नियमित परीक्षण करून पाण्याची उपलब्धता आणि सुरक्षितेद्वारे प्रवाशांची सोय सुनिश्चित करण्यासाठी चालत्या डब्यांमध्ये पाण्याच्या टाक्यांसाठी 'रिअल टाइम वॉटर लेव्हल नोटिफायर सिस्टम' विकसित केल्याबद्दल मध्य रेल्वेने संयुक्तपणे सर्वोत्कृष्ट नवोपक्रमाच्या द्वितीय पुरस्कार जिंकला. प्रथम पारितोषिकासाठी ३ लाख रुपये रोख आणि द्वितीय पारितोषिकासाठी २ लाख रुपये रोख बक्षीस आहे.

जाहीर नोटीस

माझे अशील श्रीमती. पुष्पा जगजीवन मारू, यांनी दिलेल्या माहितीवरून त्यांचे वतीने जाहीर नोटीस देण्यात येते की माझे अशील खालील नमुद खोली मुळ भाडेकरू श्री. विक्रम हिरा यांच्या नावावरून स्वतःच्या नावे हस्तांतर करीत आहेत.
तरी सदरहू मिळकतीबाबत जर कोणी व्यक्तीचा, संस्थेचा, बँकेचा, किंवा अन्य कोणत्याही कंपनीचा दावा, बोजा, हक्क, अधिकार, किंवा हरकत वा आक्षेप असल्यास त्यांनी माझ्या खाली नमुद पत्त्यावर वा मालमत्ता अधिकारी, पहिला मजला, ई विभाग, यांचे कार्यालय १०, शेख हाफिझुद्दीन मार्ग, भायखळा पश्चिम, मुंबई ४०० ००८, या पत्त्यावर आपली हरकत पुढील १४ दिवसाचे आत पुराव्यानिशी सादर करावी. अन्यथा सदरहु दावे माझे अशिलावर बंधनकारक राहणार नाहीत, म्हणुन जाहीर नोटीस .

मिळकतीचा तपशील

खोली नं. २२, तळ मजला, चाळ नं. "५/ बी'', ५६ / जी, रसुल जीवा कंपाऊंड, केशवराव खाडये मार्ग, सातरस्ता, जेकब सर्कल, मुंबई, महाराष्ट्र, पिन - ४००००११ ही निवासी मालमत्ता.
दि: ०७ फेब्रुवारी २०२५

सही/-
श्री. विनायक जोतिबा फडके,
वकील उच्च न्यायालय,
कार्यालय नं. ०१, रविकीरण साफल्य बिल्डींग,
पहिला मजला, ना. म. जोशी मार्ग,
लोअर परेल, करी रोड, मुंबई- ४०० ०१३,
मोबाईल नं.-९८३३८०७५१५

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

भारत सरकार का उपक्रम A Government of India Enterprise
कालबादेवी मुंबई शाखा, ६८/७२, बाबू गेनू मार्ग, नू हनुमान गल्ली, **मुंबई-** ४००००२
दुरध्वनी क्र.: ०२२-२२०५६७७७, **ई-मेल:** ubin900583@unionbankofindia.bank

ताबा सूचना जोडपत्र IV (स्थावर मालमत्तेसाठी) [नियम-८(१)]

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार युनियन बँक ऑफ इंडियाच्या लायन पूर्व शाखा, मुंबई ये सिक्युरिटायझेशन अँड रिकंस्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शियल ॲसेट्स अँड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत प्राधिकृत अधिकारी आहेत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) नियमावली २००२ च्या नियम ३ सह वाचल्या जाणाऱ्या कायद्याच्या कलम १३ (१२) अंतर्गत कर्जदार **श्री. भटीभवार भूपतिराव, श्रीमती उषादेवी भूपतिराव आणि श्री. राजीवकुमार भूपतिराव** ह्यांना नोटीसमध्ये नमूद करण्यात आलेली **रक्कम रु. २,२८,४३१.७६/- (रुपये दोन लक्ष अठ्ठाविस हजार चारशे एकतीस आणि सहाहजार पैसे साठ)** चा भरणा नमूद सूचना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत करण्याबाबती मागणी सूचना दिनांकित २८.१०.२०२४ अन्वये करण्यात आली होती.

कर्जदाराना रकमेचा भरणा करता आला नसल्यामुळे विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे देण्यात येत आहे की येथे खालील परिशिष्टामध्ये वर्णन करण्यात आलेल्या मालमत्तेचा नमूद नियमावलीच्या नियम ८ सह वाचल्या जाणाऱ्या नमूद कायद्याच्या कलम १३ (४) मध्ये देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून निम्नस्वाक्षरीकारांनी **१४ फेब्रुवारी** २०२५ रोजी सांकेतिक ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार आणि सामान्य जनतेला ह्याद्वारे सावध करण्यात येत आहे की मालमत्तेशी कोणताही व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी जर व्यवहार झाला असल्यास **रक्कम रु. ३,३५,६४५.४४/- (रुपये तीन लाख पस्तीस हजार सहाशे पस्तीसचौसष्ट आणि चौऱ्याहत्तर पैसे मात्र)** अधिक त्यावरील व्याजाचा भरणा युनियन बँक ऑफ इंडिया कडे करण्यासाठी बाध्य असतील.

सुरक्षित नमूद संपत्तियासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ (८) मधील तरतुदीकडे कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन :

सदनिका क्र. ३०४ , ३ रा मजला, ड्यानरा क्र. ई सी १३६, तौरस को-ऑप हाऊसिंग सोसायटी लि, सेक्टर ५, एक्सरसाईज सिटी, वसई (पूर्व), जिल्हा ठाणे – ४०१२०८ या सामावेश असलेल्या मालमत्तेचा सर्व खंड आणि भूखंड. सीमा: **उत्तरेस:** सदनिका क्र. ३०१. **दक्षिणेस:** भिंत, **पूर्वेस:** सदनिका क्र. ३०३. **पश्चिमेस:** जीना

दिनांक: १४.०२.२०२५
ठिकाण: वसई

सही/-
प्राधिकृत अधिकारी
युनियन बँक ऑफ इंडिया

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

(म्हाडाचा घटक)

म्हाडा MHADA

ई-निविदा

ई-निविदाक्र.का.अ./कुर्ला विभाग/मुंबई मंडळ/०१/२०२५

Main Portal: https://mahatenders.gov.in, MHADA Portal :https://mhada.gov.in

कार्यकारी अभियंता कुर्ला विभाग, मुंबई मंडळ, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१, बांधकाम खालील दर्शविलेल्या कामासाठी नोंदणीकृत कंत्राटदार / ठेकेदार पात्रताकरु बोच्या त्या प्रणालीसाठी ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. ई-निविदा वरील संकेतस्थळावर दिनांक १८.०२.२०२५ (सकाळी १०.०० वाजेपासून) ते दिनांक २४.०२.२०२५ (दुपारी ३.०० वाजेपर्यंत) उपलब्ध आहेत.

कामाचे नाव - रेहक नगर, कुर्ला (पू) येथील पाण्याची टाकी व पंप हाऊस स्थलांतरीत करणेबाबत.

ई - निविदा क्र.	कामाचे नाव	निविदेचे अदाज एकरीय रक्कम (रु)	इसारा रक्कम (१% अदाज एकरीय रक्कमेवर) (रु)	सुरक्षा अनामत रक्कम २% अदाज एकरीय रक्कमेवर (रु)	को-रा निविदेची रक्कम (१.५% जी.एस.टी.सह) (रु)	नोंदणी वर्ग	काम कार्यवाही कालावधी
१	रेहक नगर, कुर्ला(पू) येथील पाण्याची टाकी व पंप हाऊस स्थलांतरित करणेबाबत.	२२,९४,२८०/-	२२,९४३/-	४६,०००/- (५०% रोखीने व ५०% बाकु देणकसुरु)	५९८/-	वर्ग-अ व वरील	०६ महिने

जे ठेकेदार पात्रताबाद ई-निविदा प्रक्रियेत भाग घेत आहेत त्यांना संकेतस्थळावर दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम डिजीटल युवर आयडी व पासवर्ड प्राप्त करून घेणे आवश्यक आहे.
ई- निविदा संबंधी काही सहाय्यता आवश्यक असल्यास हाऊसलोड / अपलोड इ. साठी साहय्यता क्रमाप्रमाणे फोन नं.१९९३७७७ २२३३ / +९१-७८८००७७३७ / +९१-७८८००७५१३३,
email:eproc.support@mahatenders.gov.in वेब्साईट संपर्क साधावा.
ई-निविदा प्रक्रिया कामासंदर्भात वरील सर्व माहिती वरील संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

CPRO/A/90

Follow us:@mhadaofficial

म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

सही/-
कार्यकारी अभियता
कुर्ला विभाग, मुंबई मंडळ

पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

कार्यालय : ७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३ Email : panvelcorporation@gmail.com

निविदा सूचना क्र : पमप/ उद्यान / ६५२४ / प्र.क्र.४९ / ९४ / २०२५ दिनांक : १४/०२ / २०२५

अ. क्र.	कामाचे नाव	निविदा क्र.	दिलेल्या कामाची अदाजपत्रकीय रक्कम रू.	इसारा रक्कम रुपये	कामाचा कालावधी
१.	Design, Supply, Installation, , Testing & Commissioning of Decentralised Prefabricated Packaged City Liquid Waste Management System at Gardens Under Kalamboli Node in Panvel Municipal Corporation.	P M C / Garden / 17/2024-25	रु.१,८१,५३,२८७/- (GST विरहित)	१,५०,०००/-	१२ महिने

या कामाच्या ई-निविदेबाबतची माहिती शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर | दिनांक १७/०२ / २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात येणार आहे. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

जा.क्र. पमप / जनसंपर्क./३१२५/प्र.क्र.६६ / ६६ / २०२५
जा.क्र. पमप/उद्यान /६५२५/प्र.क्र.४९/९५/२०२५
दिनांक : १४/०२ / २०२५

Sd/-
अतिरिक्त आयुक्त-I,
पनवेल महानगरपालिका,
पनवेल